मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरीत महायुतीचे मनोमिलन

## अजितदादा व योगेश बहल यांच्या शिष्टाईला यश : अण्णा बनसोडे यांना विक्रमी मतांनी विजयी करण्याचा निर्धार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीचे उमेदवार अण्णा बनसोडे यांच्या विषयी असलेली नाराजी दूर करून सर्वांचे मनोमिलन घडविण्यात माजी महापौर व महायुतीचे समन्वयक योगेश बहल यांना यश आले आहे. आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुंबईत माजी उपमहापौर डब्बू आसवानी व इतर माजी नगरसेवक आणि उद्योजक यांच्या सोबत बैठक घेऊन नाराजी दूर केली. त्यामुळे बहल यांच्या शिष्टाईला यश आले. यामुळे अण्णा बनसोडे यांच्या विजयाचा मार्ग अधिक सोपा झाला आहे.



आमदार अण्णा बनसोडे संपर्कात राहत नाहीत असे सांगून पिंपरी कॅम्पातील व्यापारी तसेच माजी महापौर डब्बू आसवानी आदींनी त्यांच्या विषयी नाराजी व्यक्त केली होती. यानंतर राष्ट्रवादीचे युवा नेते पार्थ पवार यांनी डब्बू आसवाणी यांची पिंपरीत येऊन भेट घेतली होती. त्या पाठोपाठ आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी डब्बू आसवाणी यांच्यासह सर्वांची मुंबईत बैठक घेऊन समेट घडवला. अण्णा बनसोडे यांच्या कार्यपद्धती भविष्यात निश्चित सुधारणा दिसेल असा शब्द स्वतः अजित पवार यांनी दिला आणि हे मनोमिलन घडवून आणण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष माजी महापौर योगेश बहल, माजी उपमहापौर डब्बू आसवाणी, उद्योजक श्रीचंद आसवानी, माजी नगरसेवक प्रसाद शेट्टी, शितल शिंदे, काळूराम पवार आदी उपस्थित होते. यातील काळूराम पवार यांनीही अण्णा बनसोडे यांच्याबाबत नाराजी व्यक्त करत बंडखोरी करून अर्ज भरला होता. मात्र काळूराम पवार यांच्यासह पिंपरी विधानसभा मतदारसंघातून एकूण १९ इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज माघार घेऊन यापूर्वीच अण्णा बनसोडे यांना पाठिंबा जाहीर केला आहे. यामध्ये मुख्यतः आरपीआयच्या महाराष्ट्र प्रदेश महिला अध्यक्ष व जेष्ठ माजी नगरसेवक चंद्रकांता सोनकांबळे, शिवसेनेकडून प्रबळ इच्छुक दावेदार माजी नगरसेवक जितेंद्र ननावरे, कामगार नेते बाबा कांबळे यांच्यासह इतर १९ उमेदवारांचा समावेश आहे.

पुणे जिल्ह्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात उमेदवारी अर्ज माघार घेऊन अण्णा बनसोडे यांना पाठिंबा दिल्यामुळे पिंपरी विधानसभा मतदारसंघ विशेष चर्चेत राहिला. पिंपरी कॅम्प परिसरात विशेष प्राबल्य असणारे माजी उपमहापौर डब्बू आसवानी आणि उद्योजक श्रीचंद आसवानी यांचा बनसोडे यांच्या उमेदवारीला तत्वता विरोध होता. हा विरोध ही संपवण्यात अजित पवार आणि योगेश बहल यांना यश आल्याने अण्णा बनसोडे यांचा मार्ग अधिक सुकर झाल्याचे दिसते.

आता अजितदादा पवार आणि आरपीआय सह महायुतीतील इतर सर्व घटक पक्षांनी अण्णा बनसोडे यांना विक्रमी मतांनी निवडून देण्याचा निर्धार केला आहे अशी माहिती महायुतीचे समन्वयक व माजी महापौर, पिंपरी चिंचवड राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

---

# राहुल कलाटे यांच्या ईव्हीएम डेटा न देणाऱ्या आरोपावर निवडणूक विभागाची स्पष्टता..

## चिंचवड विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया नि:पक्षपातीपणे, पारदर्शक वातावरणातच..

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांनी ईव्हीएम डेटा देण्यास टाळाटाळ होत असल्याची ओरड करत निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. त्यावर चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे स्पष्टता दिली आहे.

पत्रकात त्यांनी म्हटले आहे कि, चिंचवड विधानसभा मतदारसंघासाठी उपलब्ध मतदान यंत्रांच्या प्रथम आणि द्वितीय सरमिसळ (रॅन्डमायझेशन) नंतरची यादी तसेच मतदानासाठी मतदानयंत्र तयार करताना (कमिशनिंग) अकार्यान्वित झाल्यामुळे बदलण्यात आलेल्या मतदान यंत्रांच्या (बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट) यादीबाबत उमेदवारांना माहिती देण्यात आली नाही, असे वृत्त प्रसारमाध्यमांमध्ये प्रसारित झाले आहे, या पार्श्वभूमीवर विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया नि:पक्षपातीपणे, पारदर्शक वातावरणात पार पाडण्यात येत आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी दिली.

पवार यांनी सांगितले, मतदान यंत्रांची प्रथम सरमिसळ जिल्हास्तरावर पार पडल्यानंतर ८ नोव्हेंबर २०२४ रोजी निवडणूक निरीक्षक मनवेश सिंग सिद्धू यांच्या उपस्थितीत आणि उमेदवार तसेच प्रतिनिधी यांच्या समक्ष मतदान यंत्रांची द्वितीय सरमिसळ प्रक्रिया थेरगाव येथील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ग क्षेत्रीय कार्यालयातील तिसऱ्या मजल्यावरील बापुजी बुवा सभागृहात पार पडली. याबाबत सर्व उमेदवारांना उपस्थित राहण्यासंदर्भात कळविण्यात आले होते.

मतदान यंत्रांच्या द्वितीय सरमिसळ प्रक्रियेवेळी उपस्थित उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना सरमिसळ करण्यात आलेल्या मतदान यंत्रांच्या यादीची प्रत त्याच दिवशी उपलब्ध करुन देण्यात आली होती. इतर उमेदवारांना सदर यादी ई-मेलद्वारे पाठविण्यात आली. त्यानंतर ९ ते ११ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत विधानसभा मतदारसंघासाठी मतदानासाठी मतदानयंत्र (कमिशनींग) तयार करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात आली. त्यावेळी अकार्यान्वित झालेल्या व बदलण्यात आलेल्या मतदान यंत्राची यादीही त्यावेळी उपस्थित असलेले उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना समक्ष देण्यात आली. उर्वरित उमेदवारांना ई मेलद्वारे

पाठविण्यात आली.

भारत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सूचनांनुसार चिंचवड विधानसभा मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया नि:पक्षपातीपणे, पारदर्शक वातावरणात सुरू असून या प्रक्रियेबाबतची आवश्यक माहिती सर्व उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना व्यक्तीश: तसेच दूरध्वनी, ई-मेल, व्हॉट्स ॲपद्वारे देण्यात येत आहे, अशीही माहिती पत्रकाद्वारे चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अनिल पवार यांनी दिली आहे

---

# निवडणुकांमुळे मंगळवारी आणि बुधवारी शहरातील शाळांना सुट्टी..

## शाळांना सुट्या देण्याच्या सूचना प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी दिल्या आहेत.




**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांमुळे मंगळवारी (दि. १९) आणि बुधवारी (दि. २०) असे दोन दिवस महापालिका शाळा तसेच ज्या शाळेत मतदान केंद्रे आहेत, अशा शाळांना सुट्या देण्याच्या सूचना प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांनी दिल्या आहेत.

विधानसभा निवडणुकांचे मतदान बुधवारी (दि. २०) होत आहे. त्यासाठी शिक्षक आणि मतदान केंद्रासाठी शाळांच्या इमारतीही वापरण्यात येणार आहेत. त्यामुळे मतदानाच्या तयारीसाठी म्हणजेच आदल्या दिवशी मंगळवारी (दि. १९) खोल्या ताब्यात घेण्यात येणार आहेत.

तसेच मतदानाच्या दिवशी बुधवारी (दि. २०) मतदान होणार आहे. त्यामुळे दोन दिवस शाळांना सुट्ट्या देण्यात आल्या आहेत. गुरुवारी (दि. २१) पूर्ववत सुरू होतील, असं अधिकाऱ्यांनी सांगितले.

निवडणुकांसाठी मतदान केंद्रे म्हणून शहरातील महापालिका तसेच खासगी शाळांच्या खोल्याही घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे खासगी शाळांनी सोमवारी अर्धा दिवस तसेच मंगळवार व बुधवार अशा सुट्ट्या दिल्या आहेत. तर काही शाळांनी ऑनलाईन वर्ग घेण्याची पर्यायी व्यवस्था केली आहे.

# शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची तोफ धडाडणार

## द्रौपदा लॉन्स येथे सायंकाळी 4 वाजता होणार सभेला प्रारंभ, महायुतीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते राहणार उपस्थित

**पुणे | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - आरपीआय (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची जाहीर सभा आज (दि.१६ ) भूमकर चौक येथील द्रौपदा लॉन्स याठिकाणी सायंकाळी ४ वाजता होणार आहे.



या सभेला चिंचवड विधानसभा मतदारसंघातील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय (आठवले) यांच्यासह मित्रपक्ष महायुतीतील सर्व प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

या सभेसाठी महायुतीच्या वतीने जय्यत

करण्यात आली असून चिंचवड मतदारसंघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्तपणे या सभेला उपस्थित राहावे, असे आवाहन महायुतीच्या वतीने करण्यात आली आहे.

दरम्यान, चिंचवड विधानसभा मतदारसंघातील वाहतूक कोंडीच्या मुख्य समस्येवर या सभेत नितीन गडकरी काय बोलणार याकडे चिंचवडकरांचे लक्ष असणार आहे.

---

# इंद्रायणीनगर , बालाजीनगरमधून अजित गव्हाणे यांना 'लीड' मिळवून देण्याची जबाबदारी आमची !

## माजी नगरसेवक उतरले मैदानात; इंद्रायणीनगरची शांतता, सलोखा महत्वाचा

**पुणे | प्रतिनिधी**

इंद्रायणीनगर, बालाजीनगर परिसरातील शांतता आणि सलोखा महत्त्वाचा आहे असे म्हणत परिसरातील ज्येष्ठ पदाधिकारी, माजी नगरसेवक गुरुवारी महाविकास आघाडीचे उमेदवार अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरते. इंद्रायणीनगर , बालाजीनगरमधून अजित गव्हाणे यांना 'लीड' मिळवून देण्याची जबाबदारी आमची असे म्हणत या पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीच्या शेवटच्या टप्प्यातील प्रचारात चांगलीच रंगत आणली. दरम्यान भोसरी येथे बुधवारी झालेल्या शरद पवार यांच्या सभेमुळे वातावरण फिरले असल्याची प्रचिती या प्रचार दौऱ्यातील गर्दीमुळे पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

महाविकास आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार अजित गव्हाणे यांच्या प्रचारार्थ गुरुवारी (दि 14) प्रचार दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रचार दौऱ्यात सहभागी झालेल्या माजी नगरसेवक, जेष्ठ पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली. यावेळी बालाजीनगर, इंद्रायणीनगर मधून अजित गव्हाणे यांना 'लीड ' मिळवून देण्याची जबाबदारी आमची असल्याचे यावेळी पदाधिकाऱ्यांनी सांगितले.



अजित गव्हाणे यांनी गुरुवारी बालाजीनगर येथून प्रचाराला सुरुवात केली. या परिसरातील गणपती मंदिर, दुर्गा माता मंदिर, हनुमान मंदिर, दत्त मंदिर येथे त्यांनी दर्शन घेतले. यावेळी विविध मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी अजित गव्हाणे यांचे उत्स्फूर्त स्वागत केले. यामध्ये समता मंडळ, साम्राज्य प्रतिष्ठान, वीर हनुमान, उत्कृष्ट मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी गव्हाणे यांचे स्वागत केले. मंडळाच्या विविध सामाजिक उपक्रमांना अजित गव्हाणे यांचा नेहमीच पाठिंबा असतो.त्यामुळे मंडळाचे पदाधिकारी, सदस्य व त्यांचे कुटुंबीय गव्हाणे यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे यावेळी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

### पदाधिकाऱ्यांची शक्ती एकवटली

» बालाजीनगर, इंद्रायणीनगर परिसरामध्ये आजी -माजी पदाधिकारी, माजी नगरसेवकांची शक्ती एकवटलेली दिसून आली. गुरुवारी या प्रचार दौऱ्यामध्ये स्थायी समितीच्या माजी अध्यक्षा सीमा सावळे, माजी नगरसेवक संजय वाबळे, रवी लांडगे, सारिका लांडगे, विक्रांत लांडे, शिवसेना संघटक तुषार सहाने, विजयकुमार पिरंगुटे, माणिकराव जैद, चंद्रकांत नाणेकर, आकाश कंद सहभागी झाले होते. यांच्या समवेत अनेक आजी-माजी पदाधिकारी देखील उपस्थित.

> इंद्रायणीनगर, बालाजीनगर परिसरामधील शांतता आणि सलोखा या महत्त्वाचा मुद्द्यावर येथील नागरिक एकत्र आल्याचे पाहायला मिळत आहे. माजी पदाधिकाऱ्यांनी या भागातून परिवर्तन घडवण्याचा निश्चय केला आहे. या भागांमध्ये सुनियोजित व्यवस्थापन, शांतता प्रस्थापित करणे यासाठी प्रयत्न केले जातील.
>
> - अजित गव्हाणे, उमेदवार महाविकास आघाडी, भोसरी विधानसभा मतदारसंघ.

---

# मोशीकर म्हणतात, 'बफर झोन'चा प्रश्न सोडवला म्हणून महेशदादासोबत!

## बफर झोन कमी झाल्यामुळे पायाभूत सोयी-सुविधा मिळाल्या

**पुणे | प्रतिनिधी**

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला आणि तत्कालीन आमदारांनी दुर्लक्ष केलेला मोशी येथील 'बफर झोन'चा प्रश्न आमदार महेश लांडगे यांच्यामुळेच सुटला आहे. लांडगे यांच्या पाठपुराव्याने 'बफर झोन'ची हद्द ५०० मीटरवरून १०० मीटर इतकी कमी करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे आम्ही महेश लांडगे यांच्या पाठीशी असल्याची ग्वाही मोशीकरांनी दिली. या भागातून विजयी मताधिक्य देण्याचा निर्धार केला.

भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी- आरपीआय व मित्र पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार आमदार महेश लांडगे यांनी मोशीतील आदर्शनगर, खान्देशनगर, गंधर्वनगरी, तापकीरनगर, फातिमानगर, संत ज्ञानेश्वरनगर परिसरातील सर्व कॉलनीतील नागरिकांच्या आपुलकीच्या गाठीभेटी घेतल्या. चंद्रकांत नखाते, वंदना आल्हाट, निखिल बो-हाडे, राजश्री सस्ते, गणेश सस्ते यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार लांडगे यांचे ठिकठिकाणी उत्स्फूर्तपणे स्वागत केले आणि विजयी मताधिक्य देण्याचा निर्धार मोशीकरांनी केला.



मोशी येथील कचरा डेपोसाठी 'बफर झोन'ची हद्द ५०० मीटर करण्यात आली होती. त्यामुळे येथील काही नागरिकांनी ही हद्द होण्याआधीपासूनच अर्धा-एक गुंठा जमीन घेऊन तेथे बांधलेली घरे बाधित होत होती. त्यामुळे रस्ता-पाणी-वीज या सारख्या पायाभूत सुविधा मिळविण्यात अडचण निर्माण निर्माण झाल्या होत्या. या घरांवर कारवाईची टांगती तलवार होती. आमदार महेश लांडगे यांनी 'बफर झोन'ची हद्द कमी करण्याबाबत सातत्याने अधिवेशनामध्ये लक्षवेधी मांडली होती. त्यांच्या पाठपुराव्याने 'बफर झोन'ची हद्द ५०० मीटरवरून १०० मीटर इतकी कमी करण्यात आली. त्यामुळे आमच्या घरांवरील कारवाईची टांगती तलवार दूर झाली. या भागात रस्ता, पाणी, वीज या सुविधा मिळू लागल्या आहेत. हा प्रश्न केवळ आमदार महेश लांडगे यांच्यामुळेच सुटला आहे. त्यामुळे आम्ही लांडगे यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. या भागातून विजयी मताधिक्य आमदार लांडगे यांना दिले जाईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

> मोशीतील कचरा डेपोसाठी 'बफर झोन'ची हद्द ५०० मीटर असल्यामुळे परिसरातील नागरिकांना पायाभूत सुविधा मिळविण्यात अडसर येत होता. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने 'बफर झोन'ची हद्द कमी होणे अनिवार्य होते. त्यासाठी स्थानिकांच्या मदतीने पाठपुरावा करून हद्द कमी केली. त्यामुळे या भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा देता आल्या आहेत. आता मोशी कचरा डेपोवर वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाचा दुसरा टप्पा आणि बायोमायनिंगचा दुसरा टप्पाही कार्यान्वयीत करण्यात येणार आहे.
>
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, उमेदवार महायुती.

# महिलांना भावतेय मविआची 'महालक्ष्मी' योजना

## महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या समर्थनार्थ रहाटणीतील ग्रामस्थांची 'वज्रमुठ'!

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे उमेदवार राहुल कलाटे यांच्या पिंपळे निलख – विशाल नगरमधील पदयात्रेत महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होऊन महाविकास आघाडीचे 'महालक्ष्मी' योजनेवर समाधान व्यक्त करत मविआचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार राहुल कलाटे यांना भरघोस मतांनी जिंकून देण्याचा निर्धार केला.



पिंपळे निलखचे ग्रामदैवत भैरवनाथ महाराजांचे आशीर्वाद घेऊन सुरु झालेल्या पदयात्रेत स्थानिक नागरिकांसह महिलांचा सहभाग लक्षणीय होता. गृहिणी ते उच्च शिक्षित मोकरदार महिलांनीही पदयात्रेत सहभाग घेतला. पदयात्रा मार्गावर महिलांनी जागोजागी औक्षण करत, 'रामकृष्ण हरी – वाजवा तुतारी'च्या घोषणा देत कलाटे यांना पाठिंबा दिला. नवयुग मित्र मंडळ चौकात मोठ्या प्रमाणात पुष्पवृष्टी करण्यात आली. चिंचवडचे प्रश्न मार्गी लागावेत यासाठी यंदा बदल होणारच असा संकल्प यावेळी नागरिकांनी व्यक्त केला.

पिंपळे निलख येथून निघालेली पदयात्रा पुढे सुतार वाडा, पंचशिल नगर, आदर्श नगर, गणेश नगर, विनायक नगर, गावठाण मार्गे जगताप डेअरीकडे रवाना झाली. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, शहर काँग्रेसच्या महिलाध्यक्षा सायली नढे, आपचे रविराज काळे, काँग्रेसचे प्रभाग अध्यक्ष माणिक भांडे, महिलाध्यक्षा प्रज्ञा जगताप, सविता कांबळे, नानी जगताप, सुषमा जगताप, संकेत जगताप, भुषण इंगवले, महेश इंगवले, प्रकाश बालवडकर, आकाश साठे, विकी साठे, सुधीर कवडे, रविकिरण काळे, आकाश जगताप, भाऊ धरपळे, प्रदीप जगताप, संदीप कामठे, सागर साठे, बाळासाहेब शिंदे, गणेश आंत्रे, आनंद साठे, महेश कामठे, रवी कांबळे, विवेक जगताप, चंदा सोमवंशी, विनायक कांबळे, संदीप इंगवले यासंह शेकडो महिला सहभागी झाल्या होत्या.

> टँकरमुक्त चिंचवड, ट्रॅफिकमुक्त चिंचवड, दोनवेळेचे मुबलक पाणी, महिलांना सुरक्षितता आणि आर्थिक स्वावलंबित्व, भ्रष्टाचार आणि भयमुक्त चिंचवडसाठी राहुलदादा कलाटे यांनाच 'तुतारी वाजविणारा माणूस' या चिन्हावर निवडून देणार.
> - रविराज काळे, युवक शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी.

> महाविकास आघाडीने मांडलेल्या महाराष्ट्रनाम्यात महिलांसाठी दरमहा ३ हजार रुपये देणारी 'महालक्ष्मी योजना', कृषी समृद्धी, बेरोजगार तरुणांना दरमहा ४ हजार भत्ता, कुटुंब रक्षणार्थ २५ लाखांचा आरोग्य विमा कवच या जनहिताच्या गोष्टी मांडल्या आहेत. त्याबद्दल लोकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. मी मांडलेले चिंचवडच्या विकासाचे 'अभिवचन'ही लोकांमध्ये लोकप्रिय होते आहे.
> - राहुल कलाटे, उमेदवार, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार.

# मतदारांना पिण्यासाठी 5 लाख पाणी बॉटल

## शहरात 15 हरित मतदार केंद्र स्थापित करणार : अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापलिकेच्या हद्दीत येणाऱ्या पिंपरी, भोसरी, चिंचवड विधानसभा मतदार संघातील मतदान केंद्रांवर इतिहासात पहिल्यांदाच महापालिकेच्या वतीने मतदारांना पिण्यासाठी सुमारे ५ लाख पाणी बॉटल्स उपलब्ध करून देण्यात येणार असून सुमारे ३०० सुरक्षारक्षक कर्मचारी, २५० महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान, १५ हरित मतदान केंद्र, आपत्कालीन विद्युत व्यवस्था, मतदान केंद्रांवर बैठक व्यवस्था आदी सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यास आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली असून यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवून कामकाज करावे, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी दिले.




सार्वत्रिक विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने शहरातील पिंपरी, भोसरी, चिंचवड विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांवर किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचे निर्देश पुणे जिल्ह्याचे निवडणूक निरीक्षक यांनी महापालिकेला दिल्या आहेत. त्याअनुषंगाने महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काल आढावा बैठक पार पडली. या बैठकीत अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी प्रशासनाला निर्देश दिले. यावेळी पिंपरी चिंचवड पोलीस वाहतूक शाखेचे उपआयुक्त बापू बांगर, मुख्य अभियंता मकरंद निकम, सहशहर अभियंता संजय खाबडे, बाबासाहेब गलबले, देवन्ना गट्टूवार, उप आयुक्त अण्णा बोदडे, उमेश ढाकणे, निलेश भदाणे, सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे, मुकेश कोळप, विजयकुमार थोरात, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्यासह कार्यकारी अभियंता, संबधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघात एकाच इमारतीमध्ये ८ पेक्षा अधिक मतदान केंद्र असलेल्या सुमारे २७ ठीकाणी मतदारांना सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या वतीने नोडल अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. नोडल अधिकाऱ्यांनी संबधित मतदान केंद्रांवर उपस्थित सर्व यंत्रणांशी समन्वय ठेऊन सोपविण्यात आलेले कामकाज करावे, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी बैठकीत दिले. यामध्ये ८ पेक्षा अधिक मतदान केंद्र असलेले चिंचवड विधानसभा मतदारसंघात एकूण ११ ठिकाणे आहेत, पिंपरी विधानसभा मतदारसंघात एकूण ४ ठिकाणे तर भोसरी विधानसभा मतदारसंघात एकूण १२ ठिकाणे असून महापलिकेच्या वतीने शहरातील सर्व मतदान केंद्रांवर विविध सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त जांभळे पाटील यांनी सांगितले.

**मतदारांना पिण्यासाठी ५ लाख बॉटल्स**

पिंपरी, भोसरी, चिंचवड मतदार संघातील सर्व मतदार केंद्रांवर मतदारांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली असून मतदानासाठी रांगेत उभे असलेल्या मतदारांना महापालिकेच्या वतीने सुमारे ५ लाख पाणी बॉटल्स उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

> मतदान केंद्राच्या ठिकाणी किमान सुविधा उपलब्ध करून देताना कोणतीही कमतरता राहणार नाही याची सर्व नोडल अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. तसेच सर्व यंत्रणांशी समन्वय ठेवून कामकाज पार पाडावे.
> - प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# निष्क्रिय आमदाराला घरी बसवा : शरद पवार

## महाविकास आघाडीचे उमेदवार प्रशांत जगताप यांच्या प्रचारार्थ हडपसरमध्ये जाहीर सभा

**पुणे | प्रतिनिधी**

‘एकेकाळी हडपसर हे सामाजिक चळवळींचे केंद्र होते. इथे रयत शिक्षण संस्थेचे मोठे जाळे आहे. चांगले शिक्षण या भागात दिले जाते. अनेक मोठमोठ्या कंपन्या, उद्योग येथे आहेत. अण्णासाहेब मगर, रामराव तुपे यांच्यासारख्या बऱ्याच मंडळीनी योगदान दिले. सामान्य माणसांचे हित जपण्याचे काम त्यांनी केले. लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याचे काम पूर्वी व्हायचे. विठ्ठलराव तुपे त्यात होते. त्यांचा वारसा त्यांचा मुलगा पुढे चालवेल, असे वाटले होते. म्हणून त्यांना मागीलवेळी विधानसभेवर पाठवले. परंतु, त्यांना लोकांचे प्रश्न सोडवण्यात कवडीचीही आस्था नाही. त्यांनी भ्रमनिरास केला. त्यामुळे अशा निष्क्रिय व्यक्तीला घरचा रस्ता दाखवण्याची वेळ आलेली आहे. ती तुम्ही हडपसरच्या लोकांनी दाखवावी आणि कामाचा माणूस निवडावा,’ असे आवाहन शरद पवार यांनी केले.



हडपसर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार प्रशांत सुदाम जगताप यांच्या प्रचारार्थ माळवाडी, हडपसरमध्ये आयोजित जाहीर सभेत शरद पवार बोलत होते. प्रसंगी प्रशांत जगताप यांच्यासह माजी खासदार ॲड. वंदना चव्हाण, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब शिवरकर, माजी आमदार ॲड. जयदेव गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष जगन्नाथ बापू शेवाळे, समाजवादी नेते प्रा. सुभाष वारे, माजी महापौर अंकुश काकडे, राष्ट्रवादीच्या युवती अध्यक्ष सक्षणा सलगर, झोपडपट्टी सुरक्षा दलाचे भगवानराव वैराट, माजी उपमहापौर बंडूतात्या गायकवाड, माजी नगरसेवक योगेश ससाणे, ॲड. हेमा पिंपळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख संजय मोरे, उपशहरप्रमुख समीर तुपे, राष्ट्रवादी'चे हडपसर विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष प्रवीण तुपे, रवींद्र माळवदकर, माजी नगरसेवक विजय देशमुख, निलेश मगर, प्रशांत सुरसे, पल्लवी सुरसे, नमेश बाबर, गायक राजेश सरकटे आदी उपस्थित होते. दिलीप तुपे, अनिल तुपे, कुमार तुपे, संजय साळवे, अहमद काझी यांनी कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला.

"सावित्रीबाई, रमाईच्या महाराष्ट्रात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना दुर्दैवी आहेत. महायुतीच्या काळात महिलांवरील अत्याचाराच्या ६७,३८१ तक्रारी, तर मुली-महिला बेपत्ता होण्याच्या ६४ हजार घटना नोंदल्या गेल्या आहेत. राज्याच्या गृहमंत्र्यांच्या जिल्ह्यात १३ हजार मुली बेपत्ता आहेत. महिलांना सन्मान व सुरक्षा देण्यात अपयशी ठरलेल्या महायुती सरकारची सुट्टी करण्याची वेळ आली आहे," अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी महायुती सरकारवर हल्लाबोल केला.

शरद पवार म्हणाले, "सत्ताधारी केवळ स्वार्थाचे राजकरण करीत आहेत. शेतकरी, महिला, तरुण यांच्याकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नाही. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या होत आहेत, ही दुःखाची गोष्ट आहे. काळ्या आईची सेवा करणारा, लाखोंचा पोशिंदा संकटात असताना महायुतीचे लोक काहीही करत नाहीत. लाडकी बहीण योजना राबविली जात असताना त्यांचा सन्मान व सुरक्षा पायदळी तुडवली जात आहे. राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. बेरोजगारी, महागाईच्या ओझ्याने सर्वसामान्य नागरिक पिचला जात आहे. सत्ताधारी पक्षातील लोक मात्र, स्वतःची प्रसिद्धी आणि घरे भरण्याचे काम करत आहेत."

### महाविकास आघाडीचा अंकुश

» सहा महिन्यापूर्वी लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांचे सहकारी 'अबकी बार चारशे पार'चा नारा देत होते. सरकार चालवायला ३०० खासदार पुरेसे असतात. असे असूनही, यांना ४०० पार का जायचे, याचा विचार केल्यावर लक्षात आले की यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली राज्यघटना बदलायची आहे. तशा स्वरूपाची वक्तव्ये त्यांच्या अनेक खासदारांनी व नेत्यांनी केली होती. भाजपचा व मोदींचा हा डाव हणून पाडण्यासाठी आम्ही सर्व लोक एकत्र बसलो, इंडिया आघाडी स्थापन केली आणि लोकसभेला त्यांना अडीचशेच्या आतमध्ये आणले. घटनेला हात घालू पाहणाऱ्या भाजपवर अंकुश ठेवण्याचे काम राज्यातही महाविकास आघाडीने केले आणि ४८ पैकी तब्बल ३० जागा जिंकल्या. त्यामुळे घटनेत बदल करण्याचे त्यांचे मनसुबे उधळले गेले, असे शरद पवार यांनी नमूद केले.

# राज्यात 18, 19 नोव्हेंबरला शाळांना सुटी नाही

## 18, 19 नोव्हेंबरला शाळा सुरूच राहणार : शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांची माहिती

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यात १८ आणि १९ नोव्हेंबरला शाळा सुरूच राहणार आहेत. कोणतीही सार्वत्रिक सुटी जाहीर केलेली नाही. केवळ ज्या शाळेतील सर्व शिक्षकांची नियुक्ती निवडणूक कामासाठी झाल्यामुळे एकही शिक्षक शालेत उपलब्ध नसल्यास संबंधित शाळांबाबत स्थानिक स्तरावर मुख्याध्यापकांनी त्यांच्या अधिकारात सुट्टी जाहीर करावी अशा सूचना आहे, असे स्पष्टीकरण शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिले.



शिक्षण आयुक्तालयाने १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शाळांना सुटी देण्याचा प्रस्ताव शिक्षण विभागाला सादर केला होता. या अनुषंगाने शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी परिपत्रकाद्वारे शिक्षण आयुक्तांना निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ सुरळीतपणे पार पाडण्यासाठी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे ज्या ठिकाणी शाळा भरवणे शक्य नसेल, त्या ठिकाणी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत आयुक्त स्तरावरून आवश्यक त्या सूचना देण्याबाबत असे नमूद करण्यात आले. मात्र, या संदर्भात संभ्रम निर्माण झाल्याचे निदर्शनास आल्याने शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी स्पष्टीकरण दिले.

मांढरे दिलेल्या माहितीनुसार १८ आणि १९ नोव्हेंबर रोजी सुट्टी जाहीर करण्याबाबत काही संभ्रम निर्माण झाल्याचे दिसते. शासनाने या संदर्भात परिपत्रकाद्वारे दिलेल्या सूचना अत्यंत स्पष्ट आहेत. १८ आणि १९ रोजी सर्व शाळा सुरू राहतील. कोणतीही सार्वत्रिक सुट्टी जाहीर केलेली नाही. केवळ ज्या शाळेतील सर्व शिक्षकांची नियुक्ती निवडणूक कामासाठी झाल्यामुळे एकही शिक्षक शाळेत उपलब्ध असणार नाही अशा शाळाबाबत स्थानिक स्तरावर मुख्याध्यापक यांनी त्यांचे अधिकारात सुट्टी जाहीर करावी अशा सूचना आहेत. त्यामुळे अशा शाळा वगळता उर्वरित सर्व शाळा नियमितपणे सुरू राहतील.